# नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग

जा.क्र.नमुंमपा/शि.वि./अनुसूची.वै.मा./१८०२/२०१६
नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग
दिनांक : ०५/०८/२०१६

प्रति,
मुख्याध्यापक मुख्याध्यापिका
मान्यताप्राप्त खाजगी प्राथ. शाळा ---------------------
नवी मुंबई.

**विषय : संच मान्यता सन २०१५-१६ च्या दुरूस्तीबाबत.**
**संदर्भ :-** मा. शिक्षण उपसंचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांचेकडील पत्र क्र. प्राशिसं/सं.मा./२०१५-१६/३५-र/४१०१ दिनांक ०३/०८/२०१६

उपरोक्त विषयी सन २०१५-१६ च्या संचमान्यता दुरूस्तीबाबत सोबत संलग्न केलेल्या संदर्भिय पत्रानुसार उचित कार्यवाही करावी.

०५/०८/१६
**(संदीप संगवे)**
**शिक्षणाधिकारी**
**नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग**

१८७

सोबत :- संदर्भिय पत्राची प्रत.

Scanned by CamScanner

प्राथमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
१७, आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ, पुणे-१.
दुरध्वनीः- (०२०)२६१२४५७२ ई मेलः- depmah@gmail.com

8909

तात्काळ

क्र. प्राशिसं/सं.मा./२०१५-१६/३५-२/
दिनांकः-०३/०८/२०१६.

0 3 AUG 2016

प्रति,
१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व).
२. शिक्षणाधिकारी महानगरपालिका बृहन्मुंबई,
३. शिक्षणाधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद, (सर्व).

**विषयः- संचमान्यता सन २०१५-१६ च्या दुरुस्तीबाबत.**

सन २०१३-१४, २०१४-१५ व २०१५-१६ या तीन वर्षाच्या राज्यातील संचमान्यता ऑनलाईन पध्दतीने संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / शिक्षण निरीक्षक यांनी उपलब्ध करुन दिल्या आहेत.

तथापि, संस्थाचालक, मुख्याध्यापक, विविध संघटना यांनी या संचमान्यतेमध्ये त्रुटी असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. सदर त्रुटींचा शोध घेतला असता या त्रुटी संगणकावर माहिती भरत असताना चुका झाल्यामुळे उद्‌भवल्या असल्याचे शिक्षणाधिकारी व मुख्याध्यापक यांनी बैठका / क्षेत्र भेटीच्या वेळी सांगितले आहे. त्याचे स्वरुप सर्वसाधारण पुढीलप्रमाणे आहे :

१. सन २०१४-१५ चे संचमान्यतेसाठी आवश्यक माहिती भरत असताना प्राथमिक / उच्चप्राथमिक शिक्षक पदांची संख्या व अनुदानित / विनाअनुदानित तुकडयांची संख्या गैरसमजुतीने चुकीची भरली आहे.
२. सन २०१५-१६ ची संचमान्यतेमध्ये सरल प्रणालीमधील विद्यार्थी संख्या विचारात घेतली आहे. मात्र दि. १६/१०/२०१५ नंतरची विद्यार्थीसंख्या विचारात न घेतल्याने शिक्षक पदाच्या संख्येवर परिणाम झालेला आहे.
३. यापूर्वी माध्यमनिहाय संचमान्यता पूर्वापार पध्दतीने करण्यात येत होती. काही जिल्हयांमध्ये सन २०१५-१६ ची संचमान्यता सर्व माध्यमांची एकत्रित एकच करण्यात आली आहे.

लिपीक
आवक क्र ३१५४ दि. ५/८/१६
नवी मुंबई महानगरपालिका
शिक्षण मंडळ

Scanned by CamScanner

शाळांच्या संचमान्यतेमध्ये त्रुटी असल्याचे निदर्शनास येत आहे त्यामुळे सर्व जिल्हयांच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी स्वत: संचमान्यतेचे काम पाहणाऱ्या संबंधितांसह ज्या शाळांची संचमान्यता चुकलेली आहे, त्या शाळेच्या संचमान्यतेच्या प्रतीसह व यासंदर्भातील कागदपत्रांसह खाली नमूद केलेल्या दिनांकास व ठिकाणी स्वत: उपस्थित राहावे.

| दिनांक | विभाग | ठिकाण |
|---|---|---|
| ०८/०८/२०१६ | अमरावती, नागपूर,लातूर | आय.टी. कॉम्प्युटर लॅब, मराठवाडा मित्रमंडळ, ३०२/ए, डेक्कन जिमखाना, बीएमसीसी कॉलेजरोड, पुणे - ४११००४. |
| ०९/०८/२०१६ | मुंबई,पुणे, नाशिक | अँग्लो उर्दु बॉयज हायस्कूल,२३९० / बीकेबी हिदयतुल्ला रोड, आझम कॅम्पस कॅम्प, पुणे - ४११००१. |
| १०/०८/२०१६ | औरंगाबाद, कोल्हापूर | कर्मवीर भाऊराव पाटील विद्या मंदिर व ज्युनियर कॉलेज, धनकवडी, पुणे - ४११०४३ |

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सर्व यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या शाळांतील संचमान्यतेच्या त्रुटी उपरोक्त नमुद केलेल्या दिवसांमध्येच दुरुस्त करुन घ्याव्यात. त्यानंतर संचमान्यतेच्या कोणत्याही प्रकारच्या त्रुटी या संचालनालयास पाठविण्यात येऊ नयेत. उपरोक्त नमूद केलेल्या तीन दिवसांमध्ये संचमान्यतेच्या त्रुटी दुरुस्त न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

(शरद गोसावी)
शिक्षण उपसंचालक,
प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर : मा. डॉ. सुनिल मगर, संचालक, बालभारती तथा ई-गर्व्हनन्स सेल प्रमुख, पुणे.

प्रत माहितीस्तव : शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे
२/- आपणास सुचित करण्यात येते की, तक्त्यातील नमूद दिनांकानुसार दर्शविण्यात आलेल्या शाळांमध्ये संगणक कक्षामध्ये (कॉम्प्युटर लॅब) बैठकव्यवस्था करण्यात यावी.

Scanned by CamScanner